# महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र. ०२२-२२८३४००२
Email : tanveer.mujawar@nic.in

क्रमांक: संकीर्ण-२०१४/प्र.क्र.३१/अ-४
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक - २७ जून, २०१८.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त /सर्व जिल्हाधिकारी.

**विषय :-भूमी संपादन अधिनियम, २०१३ व भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील तरतूदीच्या अनुषंगाने संपादीत जागेचे बाजारमुल्य ठरविण्यासाठी करावयाची कार्यपध्दती.**

**संदर्भ:-** १) केंद्र शासनाचे दिनांक २६.१०.२०१५ रोजीचे पत्र.
२) शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ३०.०८.२०१६ रोजीचे पत्र.

केंद्र शासनाने दि.२६.१०.२०१५ रोजीच्या दिलेल्या मार्गदर्शनानुसार जून्या भूसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये ज्या प्रकरणी अद्याप निवाडे घोषित करण्यात आलेले नसतील अशा प्रकरणी नवीन भूसंपादन कायद्यानुसार मोबदला निश्चित करण्यासाठी मुल्यांकनाचा दिनांक हा भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ४ अन्वये सूचना प्रसिध्द केल्याचा दिनांक विचारात न घेता नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ अंमलात आल्याचा दिनांक १.१.२०१४ विचारात घ्यावा असे कळविले आहे.

२. तरी, नवीन भूसंपादन कायदा, २०१३ च्या अनुषंगाने केंद्र शासनाने दि. २६.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शनाच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांना खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

Government after careful consideration have been pleased to instruct that the cutoff date for ascertaining market value for calculation of compensation shall be the date of commencement of the RECTLAR&Act, 2013 i.e. 01.01.2014 in following cases initated prior to 31.12.2013.

- In cases, where no Award under section 11 of the old Act has been passed.
- In cases, where Award has been passed , but compensation in respect of a majority of land holding has not been paid / deposited in the account of beneficiaries as specified in 4 (1) Notification. in such cases, all beneficiaries (including those who have already received the compensation) shall get enhanced compensation as per the new Act.
- However, this shall not be applicable to cases initiated prior to 31.12.2013, where award has been passed and compensation paid in case of majority of holdings.

शासनाने केंद्र शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने सुधारीत मार्गदर्शन प्राप्त झाल्यास त्याअनुषंगाने मोबदल्यापोटी जमिनधारकांना अदा करण्यात आलेली रक्कम व वर उल्लेखित निकषानुसार अदा करावयाची रक्कम या मधील येणाऱ्या फरकाची रक्कम संबंधित भूधारकाकडून वसूल करणे आवश्यक राहील, त्यानुसार संबंधितांकडून शपथ पत्र घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

याप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

( सु. कि. गावडे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

J:\Naug2016 Backup\Desktop\Khanmwar\NOTE & LETTER.Docx 2/4

Scanned by CamScanner